क्रमांक : प्र/आस्था (४)/३५२३/२४-२५ दिनांक :

प्रति,

**विषय : प्राधिकरणाच्या नवीन इमारतीमधील ई.पी.बी.ए.एक्स. दूरध्वनी यंत्रणा व कंसोल यंत्राच्या वार्षिक देखभाल व दुरूस्ती कंत्राट करणेबाबत.**

महोदय,

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाच्या **नवीन इमारतीमधील** ई.पी.बी.एक्स दूरध्वनी सिस्टीमसंबंधी वार्षिक देखभाल व दुरूस्ती कंत्राटकरणेबाबत निविदा/दरपत्रक मागवित आहे. आपले निविदापत्र बंद लिफाफ्यातून उपरोक्त पत्यावर कार्यालयीन वेळेत दिनांक **१५ जुलै, २०२४ रोजी सायंकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करावे. अंतीम दिनांका नंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. प्राधिकरणातील ई.पी.बी.एक्स दूरध्वनी सिस्टीमसंबंधीची माहिती खालील तक्त्यात नमुद करण्यात आली आहे.

| अनु.क्र. | तपशिल | नग | रक्कम |
|---|---|---|---|
| 1 | Open Scape - 4000 (EPBAX SYSTEM) | 01 | |
| 2 | Analog Extension Module | 35 | |
| 3 | Digital Extension Module | 02 | |
| 4 | 60 Channel PRI Ports | 02 | |
| 5 | 60 Channel STMI | 01 | |
| 6 | Analog Trunk Module | 01 | |
| 7 | Dyna Hitech Power System | 01 | |
| 8 | AC Win console (Excluding PC) | 01 | |
| 9 | Xpression (Excluding server) | 01 | |
| | **Contract value (INR)** | | |
| | **GST** | | |
| | **Total Contract Value** | | |

(कृ.मा.प.)

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०००५१.
ईपीएबीएक्स +९१ २२ २६५९ ०००१/ ४०००
https://mmrda.maharashtra.gov.in

३. ई.पी.बी.ए.एक्स. दूरध्वनी यंत्रणा व कंसोल यंत्राच्या वार्षिक सर्वंकष देखभाल व दुरूस्ती दर कंत्राटाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील.

(१) नवीन इमारतीमधील ई.पी.बी.ए.एक्स. यंत्रणा व दूरध्वनी कंसोलचा वार्षिक सर्वंकष देखभाल व दुरूस्ती कराराचा कालावधी **एक वर्षाचा** राहिल.

(२) सदर वार्षिक कंत्राटामध्ये प्रत्येकी तीन महिन्यास देय असलेला देखभाल व दुरूस्तीबाबतचा सेवा अहवाल (Service Report) सादर केल्यानंतर देय असलेली रक्कम प्रत्येकी तीन महिन्यांनी अदा करण्यात येईल.

(३) तातडीच्या प्रसंगी सूचना मिळताच अल्प कालावधीत मॅकॅनिकची सेवा उपलब्ध करणे आपणांवर बंधनकारक राहिल. तसेच कार्यालयात येणा-या मॅकॅनिकला कोणताही खर्च अदा केला जाणार नाही.

(४) ई.पी.बी.ए.एक्स दूरध्वनी यंत्रणा व कंसोल आपल्या कंपनीकडे दुरूस्तीकरीता पाठविणे आवश्यक असल्यास ते पाठविण्यापूर्वी आपल्या कंपनीकडून एक सुस्थितीत असणारे ई.पी.बी.ए.एक्स. दूरध्वनी यंत्रणा व कंसोल यंत्र सदरहू यंत्राच्या बदली कार्यालयास देणे बंधनकारक राहील.

(५) कंपनी / फर्मच्या नावे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

(६) दरपत्रकामध्ये मुळ किंमत व त्यावरील GST अशी स्वतंत्र किंमत नमुद करुन सादर करावेत.

(७) दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, Overwriting पांढरी शाई लावणे टाळावे.

(८) प्राधिकरण कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही निविदा/दरपत्रक फेटाळण्याचे हक्क राखुन ठेवीत आहे.

सचिव,
**कार्यकारी समिति**